I.O.

N.C.R.B
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
**प्रथम खबर अहवाल**
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** मिरा-भाईदर, वसई-विरार **P.S.(ठाणे):** नवघर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0237 **Year (वर्ष):** 2023
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 30/03/2023 06:29

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 27/03/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 29/03/2023
**Time From (वेळेपासून):** 00:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:53 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 29/03/2023 **Time (वेळ):** 15:57 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 009
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 30/03/2023 06:16 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** गौरव धर्म काटा आफीसमध्ये, साईबाब फाटक रोड,भाईदर पुर्व

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): हरेराम रामवक्ष गुप्ता
(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :
(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1983
(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
**Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रुम नं208,आरएनपी पार्क निरजपार्क, काशिवि,शिशमहल बिल्डींग,भाईंदर पूर्व,नवघर,मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रुम नं208,आरएनपी पार्क निरजपार्क, काशिवि,शिशमहल बिल्डींग,भाईंदर पूर्व,नवघर,मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):
(j) **Phone number** (फोन नं.):
**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अमित एकनाथ पाटील | | | 1. नवघर पोलीस स्टेशन,भाईंदर पुर्व,नवघर,मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय, महाराष्ट्र,भारत |
| 2 | अमित राकेश मिश्रा | | | 1. शाप नं 03,गोडदेव नाका, ताजमहल अपार्टमेंट,भाईंदर पुर्व, नवघर,मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय,महाराष्ट्र, |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | भारत |
| 3 | संजय विजय यादव | | | 1. 404/सी,के डी एम्पायर अपार्टमेंट,मिरारोडपुर्व,नवघर, मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रूपये दराचे 20 नोटा | 10,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

10,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक 30.03.2023

मी, हरेराम रामवृक्ष गुप्ता वय 40 वर्षे, धंदा, किराणामाल दूकान, रा.शिशमहल बिल्डींग, बी विंग, रुम नं.208, आरएनपी पार्क निरजपार्क, काशिवि'वनाथ मंदीराच्या बाजुला, भाईदर पूर्व जि.ठाणे मो. 7700985602

मी वरील प्रमाणे असून वर नमूद पत्त्यावर माझे कुटूंबासह सुमारे तीन वर्षापासून भाडयाने राहण्यास आहे. माझा गाळा नं.01, राहूल पार्क बि विंग भाईंदर पूर्व येथे जनरल स्टोअर्सचे दुकान आहे. मी दुकानात किराणा वस्तु, गुटखा व तंबाखु विकत आहे. सदरचे दुकान मी तीन वर्षाकरीता भाडयाने चालविण्यास घेतलेले आहे. मी लाॅकडाऊन नंतर माझे जनरल स्टोअर्सचे दुकानात गुटखा विकण्याचे काम करीत आहे. नवघर पोलीस स्टे'शनचे पोलीस अमित पाटील व त्यांचे पंटर असे गुटखा विकणा-यांना पकडतात व त्यांचेकडून तोडपाणी करतात. पोलीस अमित पाटील हे देवाण-घेवाण फिक्स करतात व त्यानंतर पंटरपैकी एकजण येवून पैसे घेवून जातात. अंदाजे तीन दिवसापूर्वी संजय यादव याने फोन नं. 8976468320 या नंबरवरुन माझे मोबाईल नंबर 7700985602 वर फोन केला व त्या नंबरवरुन अमित पाटील साहेबांनी मला फोनवरुन बोलले की, जर तुला गुटखा व तंबाखु विकायचा असेल, तर प्रत्येक महिन्याला आठ हजार रुपये द्यावे लागतील तसेच पैसे दिले नाही तर गुटखा व तंबाखु विक्री करीत असल्याबाबत गुन्हा दाखल करीन असे बोलून पैशांची मागणी केली.

दिनांक 27.03.2023 रोजी पंटर गौरव जयंती हपानी याने त्यांचा मोबाईल नं.8369258624 वरुन माझे मोबाईल नं.7700985602 वर फोन करुन, मला गुटखा व तंबाखु विक्री करायची असेल तर अमित पाटील साहेबांची नवघर पोलीस स्टेशन येथे येवून त्यांची भेट घेण्याबाबत सांगितले. परंतु सध्या माझा गुटखा व तंबाखु विक्री करणे बंद असूनही, नवघर पोलीस स्टेशन येथील पोलीस अमित पाटील हे मला गुटखा व तंबाखु विक्री चालू ठेवण्याकरीता चालू महिन्याचे आठ हजार व मागील महिन्याचे आठ हजार असे एकूण मिळून 16,000/-(सोळा हजार ) रुपयांची लाचेची मागणी केली.

परंतु मला पोलीस अमित पाटील यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, मी दिनांक 27.03.2023 रोजी अॅन्टी करपशन ब्युरो, ठाणे येथे तक्रार दिलेली आहे.

मी दिलेल्या तक्रारी अर्जाचे अनुषंगाने ठाणे अॅन्टी करपशन ब्युरोच्या पोलीस निरीक्षक श्री. स्वप्निल जुईकर यांनी दि.27.03.2023 रोजी माझेकडे डिजीटल व्हाईस रेकाॅर्डर देवुन मला पंच साक्षीदारासह नवघर पोलीस

स्टेशन येथे पाठवुन केलेल्या पडताळणी कारवाईमध्ये लोकसेवक अमित पाटील यांचेसमक्ष खाजगी इसम मध्यस्थी संजय यादव यांनी माझेकडे दरमहा आठ हजार रुपये लाचेची मागणी केली. तसेच लोकसेवक अमितकुमार पाटील यांनी दुसरे खाजगी इसम मध्यस्थी अमित मिश्रा यांचेकडे पुढील बोलणी करण्याचे तक्रारदारास सांगितले. त्यानंतर दि.28.03.2023 रोजी माझेकडे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर देवुन मला पंच साक्षीदारासह खाजगी इसम मध्यस्थी अमित मिश्रा यांचेकडे पुढील बोलणी करण्याकरीता पाठविले. त्यानुसार मी अमित मिश्रा यांचे भाईंदर पूर्व येथील रेल्वे फाटकजवळील त्यांचे गौरव धर्म काटा या आॅफीसमध्ये पुढील बोलणी करणेकरीता गेलो. त्यावेळी अमित मिश्रा यांनी फोनकरुन खाजगी इसम मध्यस्थी संजय यादव यांना तेथे बोलाविल्यावरुन संजय यादव तेथे आले. त्यावेळी अमित मिश्रा व संजय यादव यांनी ''गुडलक समझ कर दो महिने का दस हजार रुपये तू कल ला के दे....'' असे बोलून दहाहजार रुपये स्प"ट लाचेची मागणी करून जातांना सायंकाळी 4-5 वाजेपर्यंत पैसे आणून देण्यास सांगितले परंतू माझेकडे दहा हजार रूपये उपलब्ध नसल्याने मी पो.निरी.जुईकर यांना उदया पैसे तयार ठेवतो असे सांगितले.

तद्नंतर दिनांक 29.03.2023 रोजी पोलीस निरीक्षक जुईकर यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे लाच म्हणून देण्यासाठी आणलेली रक्कम 10000/-रू. (पाचशे रुपये दराच्या भारतीय चलनी 20 नोटा) हजर केल्यानंतर सापळापूर्व कारवाई पंचासमक्ष केली. त्यानंतर अंथ्रासिन पावडर लावलेली लाचेची रक्कम व सोबत डिजीटल व्हाईस रेकॉर्डर घेवून पंचावरोबर खाजगी इसम अमित मिश्रा हे काम करीत असलेल्या भाईंदर पूर्व येथील रेल्वे फाटक जवळील त्यांचे गौरव धर्म काटा या आॅफीसमध्ये जावून त्याची भेट घेतली.

त्यावेळेस अमित मिश्रा यांनी माझेकडे हाताच्या इशा-याने लाचेची मागणी करुन उजवा हात पुढे केला त्यावेळी माझेकडील 10000/- रू. लाचेची रक्कम काढून खाजगी इसम अमित मिश्रा याचे समोर धरली असता त्यांनी लाचेची रक्कम उजव्या हाताने स्विकारुन मोजून पॅन्टचे उजव्या खिश्यात ठेवली. त्यानंतर अमित मिश्रा याने स्वतःच्या फोनवरून संजय यादव यास फोन करून त्याला माल चालू करण्याबाबत सांगितले. त्यानंतर त्याने अमित पाटील यास व्हाॅटसअप वर फोन केला परंतू अमित पाटील यांचा फोन बिझी आला. त्यानंतर मी संजय यादव यास फोन करण्यास सांगितले असता अमित मिश्रा याने स्वतःच्या फोनवरून संजय यादव यास फोन करून माल सुरु करण्यास सांगितले. त्यानंतर खाजगी इसम अमित मिश्रा यांनी लाचेची रक्कम स्विकारल्याबाबत सापळा पथकास मी पुर्वनियोजित इशारा केला. त्यानंतर लागलीच पो.निरी.स्वप्निल जुईकर यांनी खाजगी इसम अमित मिश्रा यांचे कार्यालयात येवून त्यांचे दोन्ही हाताचे मनगट पकडून त्यांना 13.53 वा.ताब्यात घेतले व त्यानंतर माझेकडील व्हाॅईस रेकाॅर्डर बंद करण्यात आला.

तद्नंतर, पोलीस निरीक्षक जुईकर यांनी सांगितल्यावरुन, अमित मिश्रा यांनी त्यांचे मोबाईल फोनवरुन स्पिकर आॅन करुन, संजय यादव यांचे मोबाईल फोनवर फोन केला व ते '' वो. हरी ओम का पेमेन्ट आ गया हैा'' असे बोलले असता, संजय यादव यांनी ' रख तेरे पास में आता हूॅं मे अभी' असे बोलले.

तसेच पोलीस निरीक्षक जुईकर यांचे सांगणेप्रमाणे अमित मिश्रा यांनी त्यांचे मोबाईल फोनवरुन स्पिकर आॅन करुन व्हाट्सअॅप काॅलव्दारे अमित पाटील, पोलीस यांचे व्हाॅट्सअॅपवर फोन करुन 'सर उसका पेमेंट आ गया क्या करु? संजय को भेजू हरीओम का... असे बोलले असता, अमित पाटील, पोलीस यांनी 'हां...' असे बोलले.

करीता, दिनांक 27.03.2023 व दिनांक 28.03.2023 रोजी केलेल्या पडताळणीत पोलीस अमित पाटील यांचे समक्ष खाजगी इसम मध्यस्थी संजय यादव यांनी माझेकडे लाचेची मागणी केली. तसेच पुढील बोलणी दुसरे खाजगी इसम मध्यस्थी अमित मिश्रा यांचेकडे करण्याचे सांगितले. त्याप्रमाणे दि.29.03.2023 रोजी केलेल्या सापळा कारवाईमध्ये खाजगी इसम मध्यस्थी अमित मिश्रा यांनी लोकसेवक अमित पाटील व खाजगी इसम संजय यादव यांचे सांगणेप्रमाणे माझेकडून 10,000@-रुपये लाचेच्या रक्कमेचा स्विकार केला. म्हणून माझी 1) अमित एकनाथ पाटील, पोलीस हवालदार नेमणुक नवघर पोलीस स्टेशन 2) खाजगी इसम अमित राकेश मिश्रा 3) खाजगी इसम संजय विजय यादव यांचेविरुध्द कायदेशिर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद माझे हिंदीतून सांगणेप्रमाणे मराठीमध्ये संगणकावर टंकलिखीत केली असुन तीची प्रिंट काढल्यानंतर मला ती हिंदीतून समजावून सांगितली असता ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे.

N.C.R.B. (एन.सी.आर.बी.)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Milind Manohar Desai(I (Inspector)) / PNMAH **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

हैराम गुप्ता

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Dabunde
(डी. डी. साळुंखे)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Milind Manohar Des
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PNMAH

ठाणे अमलदार
नवघर पोलीस स्टेशन
मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालय

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील)

| **S.No.**(अ.क्र.) | **Sex** (लिंग) | **Date/Year of Birth** (जन्म तारीक/ वर्ष) | **Build** (बांधा) | **Height (cms.)** (उंची(सें. मी.)) | **Complexion** (रंग) | **Identification Mark (s)** (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 3 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| **Deformities/ Peculiarities** | **Teeth** (दात) | **Hair** (केस) | **Eyes** (डोळे) | **Habit(s)** (सवयी) | **Dress Habit(s)** (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| **Language /Dialect** (भाषा / बोलीभाषा) | **Place Of** (का स्थान) | | | | | **Others** (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | **Burn Mark** (भाजल्याच्या खुणा) | **Leucoderma** (कोड) | **Mole** (तिळ) | **Scar** (व्रण) | **Tattoo** (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)